**प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,**
**कर्जत, जि. रायगड**

जा.क्र.ससंसं/प्राकृसंके/कृविवि/कं.म./2664/२०२२ दिनांक : 5 DEC 2022

## जाहिर प्रसिध्दी

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील कृषिविद्या विभागात रब्बी २०२२–२३ या हंगामातील शेती विषयक प्रयोगाची व बिजोत्पादनाची कामे करावयाची आहेत. कामाची यादी सोबत जोडली आहे. सदरची कामे ०१ जानेवारी, २०२३ ते ३१ मार्च, २०२३ या कालावधीत करावयाची आहेत. ही कामे निव्वळ कंत्राटी पध्दतीने करावयाची आहेत. तरी कामे करण्यास इच्छुक असणाऱ्या अनुभवी कंत्राटदारांनी आपले दरपत्रक या कार्यालयास दिनांक २३/१२/२०२२ पर्यंत किंवा त्या पुर्वी सादर करावे. सोबत कामाच्या अटी व शर्ती आपल्या माहितीसाठी जोडण्यात आलेल्या आहेत.

**सहयोगी संशोधन संचालक**
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र
ता. कर्जत, जि. रायगड

प्रत : प्रसिध्दीसाठी

१. नोटीस बोर्ड, प्रादेशिक कृषि सेशोधन केंद्र, जि. रायगड.
२. मा. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी
३. मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी
४. ग्रामपंचायत, हालीवली, किरवली यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
५. विद्यापीठ संकेतस्थळ, डॉ. बासाकोकृवि. दापोली, जि. रत्नागिरी

**प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील कृषिविद्या विभाग मधील शेतीविषयक आणि प्रायोगिक कामे ठेका पद्धतीने करावयाचे दरपत्रक**

दिनांक:

प्रती,

**मा.सहयोगी संशोधन संचालक,**
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत–४१०२०१, जिल्हा–रायगड.

विषय : प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील कृषिविद्या विभाग मधील शेतीविषयक प्रयोगाची व बिजोत्पादनाची कामे ठेका पद्धतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक

संदर्भ : जा.क्र.ससंसं/प्राकृसंके./कृविवि/कं.म./ / /२०२२ दि.

आपल्या वरील संदर्भित जाहीर प्रसिद्धी पत्रान्वये प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील कृषिविद्या विभाग मध्ये शेतीविषयक प्रयोगाची व बिजोत्पादनाची कामे ठेका पद्धतीने करण्यासाठीचे दरपत्रक खालील प्रमाणे.

| कामाचा तपशील | कृषिविद्या विभागातील कामाचा कालावधी ०१ जानेवारी, २०२३ ते ३१ मार्च, २०२३ |
|---|---|
| सोबतच्या यादीमध्ये दिलेल्या कृषिविद्या विभागामधील शेतीविषयक कामाचे दरपत्रक | रूपये..........<br>अक्षरी........... |

मला सर्व अटी व शर्ती मान्य आहेत तरी माझे दरपत्रक मंजूर करावे ही विनंती.

सही :................................................

नांव :................................................

पत्ता :................................................

## प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत जि. रायगड
### कृषिविद्या विभाग

**मला ठेक्याबाबतच्या सर्व साधारण अटी व शर्ती मान्य आहेत.**

१. प्रक्षेत्रावरील कामे संबधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमुन देतील त्याचप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२. कामाच्या देयकाची आदायगी महिना पूर्ण झाल्यावर केली जाईल, त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पूर्ण केलेबाबतच्या दाखला जोडणे आवश्यक आहे.

३. निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

४. ठेकेदाराकडे स्वतःचे पॅन कार्ड व बॅक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांच्या कामाचे वेतन व त्याअनुषंगीक रक्कम संबधीत कामगारांच्या बॅक खाती जमा करणे आवश्यक आहे.

५. ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६. प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

७. ठेक्यामध्ये असलेल्या मजूरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर विहीत कार्यपध्दती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना राहील.

८. ठेक्यातील मजूरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चित केलेली असावी.

९. याचिका क. १५९१/२०१८ संदर्भात मा. उच्च न्यायलय मुंबई यांच्या दि. १८ एप्रिल, २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगीतीस अनुसरून परिच्छेद क. ५१ (ई) नुसार याचिकाकर्त्या मजूरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

१०. ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचांऱ्याच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

११. ठेकेदार व्यक्तीस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१२. ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना/विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

१३. वरील ठेका ०१ जानेवारी, २०२३ ते ३१ मार्च, २०२३ या कालावधीकरीता मर्यादित असेल.

ठेकेदार

( )

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील कृषिविद्या विभागामधील शेतीविषयक, प्रयोगाची व बिजोत्पादनाची कामे (०१ जानेवारी, २०२३ ते ३१ मार्च, २०२३) या कालावधीत करावयाची आहेत) तरी ठेका पद्धतीने करावयाच्या कामाची यादी.

| | |
|---|---|
| १ | खरीप २०२२ हंगामातील घेण्यात आलेले विविध भात प्रयोगांची संस्काराप्रमाणे झोडणी करणे व भात साफ करणे. सदरची वजने घेवून मुख्य भांडाराकडे जमा करणे. |
| २ | चवळी, वाल (कोकण सदाबहार व कोकण सफेद) बिजोत्पादनासाठी पुर्व मशागत करणे, पेरणी करणे, खत आणि पाणी व्यवस्थापन तसेच बेणणी करणे. आंतरमशागतीची कामे करणे. |
| ३ | विविध प्रात्यक्षिकामध्ये वाल पिकाची लागवड करणे, प्रात्यक्षीकास खते, पाणी देणे व तण काढणे. आंतरमशागतीची कामे करणे. |
| ४ | मधुमका या पिकासाठी पुर्वमशागतीची कामे करणे, वाफे तयार करणे, पेरणी करणे, खताचे व पाण्याचे व्यवस्थापन करणे व आंतरमशागतीची कामे करणे. |
| ५ | मधुमका या पिकाच्या प्रात्यक्षिकाची लागवड करणे, खते, पाणी देणे, तण काढणे व आंतरमशागतीची कामे करणे. |
| ६ | विविध भात पिकाच्या लागवड पध्दतीच्या प्रात्यक्षिक प्लॉटमध्ये रब्बी हंगाम २०२२–२३ मध्ये घेण्यात आलेल्या हरभरा, वाल आणि भाजीपाला पिकांसाठी खत व पाण्याचे व्यवस्थापन, तसेच आंतरमशागतीची कामे करणे. |
| ७ | कर्जत–३ सत्यदर्शक – भात झोडणी करून साफ करणे व सदर बियाणे मुख्य भांडाराकडे जमा करणे. |
| ८ | विविध प्रयोगांची झोडणी करणे (फॉस्फरस/नायट्रोजन) संस्काराप्रमाणे निरीक्षण घेणे. (दाणे मोजणे, चुड मोजणे) इत्यादी. |
| ९ | RCT – १ रब्बी हंगाम प्रयोगांची आखणी करणे, लागवड करणे, अंतरमशागत, पुर्वमशागतीची कामे करणे. |
| १० | सर्व प्रयोगांना तसेच इतर पिकांना खते व पाणी व्यवस्थापन इत्यादी कामे करणे. |
| ११ | विभागाच्या रस्त्यावर, बांधवर, तणनाशक फवारणी करुन घेणे. |
| १२ | विविध प्रयोग व इतर पिकांची लागवड यांचे किड व रोग व्यवस्थापन करणे. |
| १३ | भात झोडणी नंतर शिल्लक पेंढा रचून ठेवणे. |
| १४ | प्रक्षेत्राच्या कुंपणाची दुरूस्ती करणे. |
| १५ | बांध बंधीस्ती दुरूस्ती करणे. |
| १६ | प्रक्षेत्रावरील नाल्याची साफसफाई करणे. |
| १७ | प्रक्षेत्रावर आयत्यावेळी उद्‌भवणारी कामे करणे. |